# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ०९–२०१०/                                                    दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. सिदगोंडा बाबू काडापुरे ,<br>रा. मुचंडी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :–
१) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सिदगोंडा बाबू काडापुरे , रा. मुचंडी, ता. जत, जि. सांगली यांनी वितरण कंपनीकडे आपल्या शेतीपंपासाठी नवीन विद्युत पुरवठा मिळावा म्हणून दि. ७.११.२००९ रोजी केला व प्रोसेसिंग फी रु. ५०/– त्याचदिवशी भरली आहे. त्यांना वि.प.ने चलन दिलेले नाही. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १०.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली.

कक्षाने दि. १६.१२.२००९ रोजी आदेश पारित केले. प्रस्तुतच्या तक्रारीद्वारे मंचाकडून विलंबापोटी भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे. तसेच दरीकोन्नूर शाखेमध्ये अनेक अर्ज प्रलंबित राहतात या बाबत मंचाने वितरण कंपनीस कडक सूचना द्याव्यात अशीही विनंती केली आहे.

वि.प.ने आपल्या दि. २०.२.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांस दि. ९.२.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे व ०.६ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम करावे लागते असे म्हटले आहे.

सदरची तक्रार मंचासमोर दि. ९.३.२०१० रोजी सुनावणीस घेतली असता, तक्रारदाराचे प्रतिनिधी हजर. श्री. ए.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग व श्री. राजमाने, कनिष्ठ अभियंता, जत उप विभाग उपस्थित. तक्रारदाराचे प्रतिनिधी यांनी चलन देण्यास दि. ६.१२.२००९ ते ९.२.२०१० या कालावधीचा विलंब झाला आहे असे सांगितले. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी या बाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. दरिकोणूर शाखेचे कनिष्ठ अभियंता इनामदार यांच्या अकार्यक्षमतेमुळे विलंब झाला आहे असे प्रतिनिधींनी मंचासमोर सांगितले. तक्रारीत म्हटल्याप्रमाणे असे अर्ज का प्रलंबित राहतात, या बाबत वि.प.स कडक सूचना करण्यात आली आहे. या उलट, वि.प.च्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, एल.टी. एक्स्टेंशन आहे व स्टाफ अपुरा आहे त्यामुळे विलंब झाला आहे.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदारास विलंबापोटी भरपाई मिळण्याचा हक्क आहे काय ?

उत्तर : होय

<u>कारणमिमांसा</u>

उभयबाजूंच्या लेखी कथनानुसार, तक्रारदार यांनी शेतीपंपाचे कनेक्शनसाठी दि. ७.११.२००९ रोजी वि.प.कडे अर्ज दिल्याचे मान्य आहे. अंतर्गत कक्षाने दि. १६.१२.२००९ रोजी आदेश दिले आहेत हेही मान्य आहे. आदेशात तक्रारदार यांस विहीत मुदतीत चलन द्यावे असे म्हटले आहे. येथे एक गोष्ट स्पष्ट होते की, दि. १६.१२.२००९ ला अंतर्गत कक्षाचे आदेश होवूनही दि. ९.२.२०१० पर्यंत चलन देण्यास वि.प.ने उशीर केला आहे व त्याबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. ०.६ कि.मी. वाहिनीचे काम आहे हे जरी खरे असले तरी त्यामुळे विलंब माफ होवू शकत नाही. वितरण कंपनीच्या प्रत्यक्ष साईटवर काम करणाऱ्या संबंधित शाखेच्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे विलंब झााला आहे हे स्पष्ट होते. वि.प.च्या वरिष्ठांनी याची योग्य ती दखल घेवून चौंकशी करावी. वि.प.ने कृती मानके विनियमातील तरतुदीचा भंग केला आहे त्यामुळे तक्रारदार यांस भरपाई देणेस वि.प. बांधील आहे. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देवून खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहेत.

ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्षांचे पद दिनांक ३.९.२००९ ते २०.१०.२००९ व सदस्य यांचे पद दि. १.९.२००९ पासून दि. २.११.२००९ पर्यंत रिक्त राहिल्याने मंच कार्यान्वित नसल्याने १०० पेक्षा अधिक प्रकरणांची सुनावणी व निर्णय प्रलंबित राहिल्याने ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००५, क्र. ५:१ चे तरतुदीनुसार सदर अपिलावर असलेल्या दोन महिन्यांचे मुदतीत निर्णय करणे शक्य झाले नाही.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने तक्रारदार यांस दि. ६.१२.२००९ ते ९.२.२०१० या ९ आठवडे विलंबाच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ९००/– भरपाई द्यावी.

३) सदर रकमेचे बिलातून समायोजन करण्यात यावे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ६.४.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :